# महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.


जावक क्रमांकः तंशिविकापु/विवि/प्रवेश-२०२३-२४/२०२२/ ५७३४ दिनांक : ०८.१२.२०२२

- 9 DEC 2022

प्रति,
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन,
पुणे, अवसरी (खु), कराड, मिरज, कोल्हापूर, सोलापूर
शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगांव
वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरींग (पॉलिटेक्नीक), सांगली
इन्स्टिट्युट ऑफ सिव्हील ॲन्ड रुरल इंजिनिअरींग, गारगोटी, जि. कोल्हापूर
कुसरो वाडीया इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे
उपसचिव, म.रा.तं.शि.मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे

विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ होण्याच्या अनुषंगाने विविध उपक्रमांद्वारे प्रसिध्दी करणेबाबत..
संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र जा.क्र. १०/एनजीपी/प्रवेश/स्कूल कनेक्ट/२०२३-२४/१०५० दिनांक २८.११.२०२२.

पदविका अभ्यासक्रमांचे प्रवेशात वाढ होण्यासाठी राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या मार्गदर्शनाखाली तसेच संचालनालयाद्वारे वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील पदविका अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांनी व अध्यापकांनी विविध सकारात्मक उपक्रम यशस्वीपणे राबविले आहेत. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या प्रवेशासाठी स्कूल कनेक्ट उपक्रमाद्वारे पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ करण्यासाठी समुपदेशन सभा, जनजागृती मोहीम इत्यादी कार्यक्रमांद्वारे, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याची प्रक्रिया डिसेंबर २०२१ मध्येच सुरु झालेली होती. या सर्व गोष्टींचा एक सकारात्मक परिणाम प्रवेश प्रक्रियेवर होत आहे. पदविका अभ्यासक्रमांच्या एकूण प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या २०१८-१९ मध्ये ४१ टक्के होती, ही टक्केवारी २०१९-२० मध्ये ५० टक्के, २०२०-२१ मध्ये ६० टक्के व २०२१-२२ मध्ये ७० टक्के झाली. यावर्षी २०२२-२३ मध्ये विद्यार्थ्यांनी पदविका अभ्यासक्रमांना विक्रमी प्रतिसाद दिलेला आहे. राज्यात २०२२-२३ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या ८५ टक्के झालेली आहे. मागील तीन वर्षांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांमध्ये सलग १० टक्के वाढ व या चौथ्या वर्षी १५ टक्के वाढ झालेली आहे. सर्व संस्थांनी व अध्यापकांनी निश्चितच कौतुकास्पद कामगिरी केलेली आहे.

मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण व मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित तंत्रनिकेतनांमध्ये १०० टक्के प्रवेश होण्याच्या दृष्टीने प्रत्येक प्राचार्यांनी पुढाकार घेऊन, संस्थेतील अध्यापकांच्या सहकार्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चे पदविका अभ्यासक्रमांचे प्रवेश वाढविण्यासाठी स्कूल कनेक्ट हा उपक्रम दिनांक ०१.१२.२०२२ पासून सुरु करण्यात यावा असे संचालनालयाचे निर्देश आहेत.

१. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी पदविका प्रवेशाकरीता संभाव्य विद्यार्थ्यांकरीता व त्यांच्या पालकांकरीता करीअर फेअर यांचे आयोजन करावे. त्यामध्ये मुख्यत्वे करुन अभियांत्रिकी क्षेत्रातील संधी व पदविका अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर उपलब्ध असलेल्या संधी तसेच विविध माध्यमांद्वारे पदविका प्रवेशाबाबत जनजागृती करावी. १०वी चे विद्यार्थी कमी वयाचे असल्यामुळे त्यांच्या विचारावर पालकांच्या विचारांचा मोठा प्रभाव असतो. त्यामुळे सदर कार्यक्रमास विद्यार्थ्यांच्या पालकांनासुध्दा निमंत्रित करावे. स्कूल कनेक्ट उपक्रमा अंतर्गत विद्यार्थी, पालक यांच्यासाठी मेळावे आयोजित करावेत. या मेळाव्यास उपस्थित असलेल्या विद्यार्थी व पालकांविषयीची माहिती गोळा करावी. विद्यार्थी व पालकांना समजतील असे विषय करीअर फेयर कार्यक्रमात ठेवून त्याप्रकारे रचना करुन कार्यक्रम आयोजित करावा व तशाच प्रकारे पार पाडावा.

२. शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन स्कूल कनेक्ट उपक्रम विद्यार्थी व पालकांसाठी राबविण्यात यावा.

३. संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी, शाळांचे मुख्याध्यापक तसेच शाळेतील मोजके शिक्षक यांच्या एकत्रित सभा संबंधित तंत्रनिकेतनांच्या प्राचार्यांमार्फत (Online / Offline) आयोजित करुन पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाबाबत जनजागृती करण्यात यावी. तंत्र शिक्षणातील विविध संधीची त्यांना कल्पना देऊन वेगाने होत असलेल्या बदलांचा विद्यार्थ्यांना फायदा होऊन त्यांचे भविष्य कसे उज्वल होईल हे विद्यार्थी व पालकांच्या तसेच जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी, शाळांचे मुख्याध्यापक तसेच शाळेतील शिक्षक यांच्या नजरेस प्राधान्याने आणून द्यावे.

४. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शिक्षणासाठी मातृभाषेची ताकद नमूद करण्यात आली आहे, यास अनुसरुन पदविका अभ्यासक्रम हा "मराठी-इंग्रजी (द्विभाषिक)" स्वरुपामध्ये तंत्रनिकेतनांमध्ये राबविण्यात येत आहे. विद्यार्थी त्यांच्या पसंतीनुसार असा विकल्प प्रवेश अर्ज भरतांना निवडू शकतात. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये एकुण प्रवेशित विद्यार्थ्यांच्या ३७ टक्के विद्यार्थी हे "मराठी-इंग्रजी (द्विभाषिक)" माध्यमामध्ये प्रवेशित झालेले आहेत. विद्यार्थ्यांना इंग्रजीव्यतिरिक्त मराठी भाषेमध्ये अभियांत्रिकीचे शिक्षण सुलभ व्हावे याकरीता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (एआयसीटीई) यांनी देखील पुढाकार घेतलेला असून एआयसीटीई द्वारे ११ पदविका अभ्यासक्रमांच्या पुस्तकांची मराठी भाषेत निर्मिती करण्यात आली आहे. ही सर्व पुस्तके विद्यार्थ्यांकरीता उपलब्ध आहेत.

५. आपल्या परिसरातील शाळेच्या मुख्याध्यापकांची भेटीची वेळ निश्चित करणे, तंत्रनिकेतनांचे सादरीकरण (PPT) करणे, पत्रके वाटणे, शाळेतील मुलांची तंत्रनिकेतनांमध्ये भेट आयोजित करणे, शाळेतील मुलांना तंत्रनिकेतनांमधील लॅब, क्लासरुम, प्रोजेक्ट, विस्तृत परिसर, प्लेसमेंट दाखवणे, शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची भेट घडविणे, गावोगावी जाऊन करिअर फेअर आयोजन करणे, इत्यादी.

६. विविध पदविक अभ्यासक्रम, पात्रता, प्रवेशनियामली, ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया यांची थोडक्यात माहिती द्यावी.

७. तंत्रशिक्षण संचालनालयाद्वारे कागदपत्रांच्या प्रत्यक्ष छाननी प्रक्रियेव्यतिरिक्त ई-स्क्रूटनीची संकल्पना कशा प्रकारे राबविण्यात येते व उमेदवार त्यांच्या सोयीनुसार छाननीची पध्दत / पर्याय कशा प्रकारे निवडू शकत होते, तसेच मोबाईलवरून अर्ज कसा भरता येतो, याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी.

८. संचालनालयामार्फत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता विद्यार्थ्यांच्या सोईसाठी १० वी चे व १२ वी चे निकाल घोषित होण्यापुर्वी प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. त्याअनुषंगानेसुध्दा विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात यावी. आवश्यकतेनुसार सदर सुविधा शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीताही उपलब्ध करुन देण्यात येईल.

९. प्रवेश अर्ज भरणे, अर्ज निश्चित करणे, गुणवत्ता यादी मधील त्रुटी दुरुस्त करणे, अंतिम गुणवत्ता यादी तपासणे, विकल्प सादर करणे, कॅप जागावाटप, जागास्वीकृती करणे, जागावाटप केलेल्या संस्थेत प्रत्यक्ष जाऊन प्रवेश घेणे इत्यादी पदविका प्रवेश संबंधीत बाबींची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना द्यावी.

१०. शाळेमध्ये तंत्रनिकेतन व तंत्रनिकेतनातील विविध शाखांचे सादरीकरण, टीपीओ/विभागप्रमुख/शैक्षणिक प्रमुख यांचे भाषण, प्रसिध्द माजी विद्यार्थी / उद्योजक यांची विद्यार्थ्यांशी अनौपचारिक चर्चा, अशा विविध उपक्रमांचे आयोजन करणे. तसेच विद्यार्थ्यांना मिळणा-या प्लेसमेंटबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी.

११. तंत्र शिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता (Entrepreneurship) वाढविण्याच्या दृष्टीने तसेच त्यांना रोजगारक्षम करण्यासाठी विद्यार्थ्यांना उद्योगात प्रशिक्षण घेण्यास प्रोस्ताहित केले जाते आणि त्यानुसार अदानी थर्मल पावर स्टेशन, एल अॅन्ड टी, सिमन्स इंडिया लिमिटेड, मर्सिडीज बेंन्ज, यामाहा, महिंद्रा अॅन्ड महिंद्रा यासारख्या उद्योगांचे प्रशिक्षण कार्यक्रम प्राध्यापक वर्ग व विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले जात आहेत. यशदा पुणे आणि एन.आय.टी.टी.आर. भोपाळ व पुणे येथील विस्तार केंद्र येथे प्राध्यापक प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येत आहेत. संचालनालयाचे टाटा, रिलायन्स, महिंद्रा आणि महिंद्रा, लार्सन अॅड टुब्रो, इन्स्टिटयूट ऑफ एअरक्राफ्ट इंजिनीअरींग या सारख्या नामवंत कंपन्यांसोबत सामंजस्य करार केले आहेत जेणेकरुन या माध्यमातून अभ्यासक्रम, अध्यापकांचे प्रशिक्षण, कौशल्य विकास/रोजगार याबाबत औद्योगिक क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शन, इंटर्नशिप इत्यादी द्वारा अध्यापनाचा दर्जावाढ करण्यास मदत होत आहे. या बाबी विद्यार्थी व पालकांना समजावून सांगाव्यात. तसेच राज्यतील विद्यार्थी व अध्यापक यांना अद्ययावत अभ्यासक्रम व प्रशिक्षण यासाठी संचालनालयाने इन्फोसिस या आयटी क्षेत्रातील नामांकित कंपनीबरोबर व नॅसकॉम सोबत सामंजस्य करार केलेला आहे. विद्यार्थी सदर अभ्यासक्रम निशुल्कपणे शिकू शकतात व आपली गुणवत्ता वृध्दींगर करु शकतात, ही बाब देखील विद्यार्थ्यांना समजावून सांगावी.

१२. उद्योगांच्या गरजांनुसार अभ्यासक्रमात सुधारणा करण्यात आली असून त्यासाठीच्या समितीवर औद्योगिक क्षेत्रातील प्रतिनिधी नियुक्त केले आहेत. सध्या औद्योगिक क्षेत्रांमधील आवश्यक गरजा आणि भविष्यातील संधींचा वेध घेऊन संस्थेमध्ये न्यू इमर्जिंग टेक्नॉलॉजी संबंधित अभ्यासक्रम व कौशल्य विकास वृध्दीसाठी अभ्यासक्रम सुरु केले गेले आहेत. 'Experiential Learning' या संकल्पनेचे महत्व लक्षात घेऊन राज्यात पदविका अभ्यासक्रमांच्या पहिल्या वर्षापासून अंतिम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी मायक्रो-प्रकल्प अनिवार्य केले आहे. अभ्यासक्रमात सुधारणा करताना उद्योगांच्या आवश्यकतांचे, त्यांच्याकडून प्राप्त सूचनांचे विश्लेषण केलेले आहे. पदविका अभ्यासक्रमांसाठी चौथ्या सत्रानंतर सर्व विद्यार्थ्यांसाठी सहा आठवड्यांचे औद्योगिक प्रशिक्षण अनिवार्य केले आहे. तंत्र शिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांमध्ये (Entrepreneurship) वाढविण्याच्या दृष्टीने संस्थेमध्ये Incubation Center स्थापन केले गेले आहेत. या सर्व बाबींचा एकत्र परिणाम होऊन तंत्र शिक्षण पदविका अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढला आहे. त्याचा परिपाक म्हणून पदविका अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांमध्ये प्रवेश वाढत आहेत व विद्यार्थ्यांना सहजपणे रोजगार उपलब्ध होत आहे. या सर्व गोष्टींचा विद्यार्थ्यांना फायदा होऊन त्यांचे भविष्य उज्वल होईल व ते रोजगारक्षम, बहुआयामी व्यक्तिमत्वाचे व उद्यमशील बनतील, या बाबी सुध्दा विद्यार्थी व पालकांच्या प्राकर्षाने नजरेस आणून द्याव्यात.

१३. स्कूल कनेक्ट उपक्रम राबविताना, शाळेतील प्रत्यक्ष उपस्थित विद्यार्थ्यांबाबत तसेच त्यांच्या पालकासबंधित माहिती संकलित करुन सदर माहिती संस्थास्तरावर जतन करण्यात यावी. पदविका प्रवेशासाठी स्वारस्य दाखविण्या-या विद्यार्थ्यांची माहिती सविस्तर डेटाबेसच्या स्वरुपात वेळोवेळी मंडळाच्या (MSBTE) संकेतस्थळावर अपडेट करण्यात यावी व विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे मोबाईल क्रमांकाचा सुध्दा त्यामध्ये समावेश करण्यात यावा. साधारणतः विद्यार्थी व पालकांविषयी तसेच संस्थेविषयीची माहिती सोबतच्या परिशिष्ट अ व ब मध्ये दर्शविल्याप्रमाणे गोळा करण्यात यावी.

**१४. सदर माहिती मंडळाच्या संकेतस्थळावर डेटाबेसच्या स्वरुपात अपडेट करतांना माहितीचे डुप्लीकेशन होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच मंडळाने त्यानुसार त्यांच्या प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करावे.**

१५. स्कूल कनेक्ट उपक्रम राबविला जात असताना आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांना Admission Process ची माहिती डिजीटल फॉरमॅट मध्ये उपलब्ध करुन देण्यात यावी.

१६. महाविद्यालयांमधील अध्यापकांनी / MSBTE ने पदविका अभ्यासक्रमांसाठी तयार केलेल E-content, तसेच राबविण्यात येणा-या विविध आधुनिक शिक्षण अध्यापनशास्त्रांचा (Teaching Pedagogy) या बद्दलची माहिती त्रोटक स्वरुपात देण्यात यावी.

१७. शासनामार्फत देण्यात येणा-या विविध शिष्यवृत्त्या विषयी माहिती देऊन तंत्र शिक्षण कमी खर्चात तसेच कमी कालावधीत पूर्ण करुन रोजगारक्षम तसेच उद्यमशील उद्योजक कसे बनता येईल यासंबंधी विस्तृत माहिती विद्यार्थी व पालकांना देण्यात यावी.

सदर विद्यार्थ्यांच्या दहावीच्या परिक्षेनंतर व विद्यार्थ्यांचा दहावीचा निकाल लागल्यानंतर सुध्दा सदर प्रक्रीया सुरु ठेवण्यात यावी. शासकीय तंत्रनिकेतनांनी परिसरातील विद्यार्थ्यांचे तसेच पालकांचे समुपदेशन करावे. तंत्रनिकेतनातील अधिकारी / कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणपत्रिका वाटपाचे वेळी शाळेत उपस्थित राहून पदविका प्रवेशाबाबत मार्गदर्शन करावे, तसेच विद्यार्थ्यांना व पालकांना पदविका प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे, प्रवेश, सुविधा केंद्रांबाबत माहिती द्यावी व तंत्रशिक्षणासंबंधी नोकरी व्यवसायाच्या संधी याबाबत मार्गदर्शन सुद्धा करावे, तसेच विद्यार्थ्यांना व पालकांना पदविका प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे, प्रवेश सुविधा केंद्रांबाबत माहिती द्यावी व तंत्रशिक्षणासंबंधी नोकरी व्यवसायाच्या संधी याबाबत मार्गदर्शन सुध्दा करावे.

**सोबत : परिशीष्ट - अ व ब**

**(मारुती रा. जाधव)**
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (कार्यासन क्र. १०) यांना माहितीस्तव सादर.
२) प्राचार्य, सर्व विनाअनुदानित अभियांत्रिकी तंत्रनिकेतने, पुणे विभाग यांना माहितीसाठी.

# परिशिष्ट -अ

## School Connect Student Registration Information.

- School Connect Participating Student Information

a) Name of the Student.

b) Name of School.

c) Standard in which student studying.

d) District.

e) Taluka.

f) Mobile No. of Candidate.

g) Email Address.

h) SSC Seat No.

i) Names of Parent.

   i) Father.

   ii) Mother.

j) Occupation of Parent.

   i) Father.

   ii) Mother.

k) Mobile No. of Parent.

   i) Father.

   ii) Mother.

l). Email ID of Parents

   i) Father.

   ii) Mother.

# परिशिष्ट -ब

## School Connect School/ Organization Registration Information

- Organizing Institute Information

a) Organizing Institute Code.
b) Organizing Institute Name.
c) Type of School Connect.
d) MSBTE School Connect Approval Order No.
e) MSBTE School Connect Approval Date.
f) Amount Sanctioned by MSBTE.

- School Connect Information

a) Name of Participating School.
b) District.
c) Taluka.
d) Venue.
e) Date.
f) Local Publicity Medium.
g) Topic of Guidence.
h) Name-Post of Speaker.
   i) Speaker Name.
   ii) Speaker Post.
i) No. of Participants.
   i) Students.
   ii) Parents.
j) Name of Co-ordinator from School.
k) Contact No. of Co-ordinator from School.
l) Email of Co-ordinator from School..
m) Designation of Co-ordinator from School..
n) Name of School Principal.
o) Mobile no of Principal.